# प्रेस नोट

दि. १०/०२/२०१८

## पोलीस अधीक्षक दिक्षीतकुमार गेडाम यांचा अवैध धंद्यांवरील कारवाईचा बडगा कायम

पोलीस अधीक्षक दिक्षीतकुमार गेडाम यांनी जिल्हयाच्या पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारल्याबरोबरच जिल्हयातील दारु, जुगार या अवैध धंद्यावरील कारवाईचा करुन अवैध धंदेवाले यांचे कंबरडे मोडले असतानाच आज दि. १०/०२/२०१८ रोजी रोजी पोलीस अधीक्षक यांना गाव मौजे आकेरी येथील पांडुरंग कृषी पर्यटन न्याहारी व निवास केंद्र, आकेरी येथे दिनेश मयेकर नावाचा इसम बेकायदेशीररित्या मुलींना व महिलांना तेथे बोलावुन घेवुन गिराईक आणुन वेश्याव्यवसाय स्वताचे फायद्याकरीता चालवित असल्याबाबत खात्रीशीर माहिती प्राप्त होताच पोलीस अधीक्षक यांचे विशेष पथकातील पोलीस निरीक्षक,श्री.पाटील स्थानिक गुन्हे शाखा यांचेसोबत राणे, तांबे, सरमळकर, प्रभुतेंडोलकर, धोत्रे व महिला पोलीस चव्हाण तसेच वाहन चालक, तेली व घोन्सालवीस या पथकाने पांडुरंग कृषी पर्यटन न्याहारी व निवास केंद्र, आकेरी येथे डमी ग्राहक (पंटर ) पाठवुन अवैधरित्या सुरु असलेला वेश्याव्यवसायावर छापा टाकत त्यामध्ये १) विश्वनाथ गोविंद नाईक वय-३८ रा. खासकीलवाडा,ता-सावंतवाडी २) दिनेश रामचंद्र मयेकर वय-४९ रा. वृदावन कॉलनी, पिंगुळी, गुढीपुर ता.कुडाळ यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे. तसेच वेश्याव्यवसायाकरीता पुणे येथुन आणलेल्या २५ वर्षीय महिलेची वेश्याव्यवसाय मधुन सुटका करण्यात आलेली आहे. तसेच सदर इमारतीची झडती घेतली असता त्यामध्ये १५०,०००/- रु. किंमतीची मारुती अल्टो के १० गाडी, ३ मोबाईलं तसेच २४००/- रु. किंमतीचा गोवा बनावटीचा दारु मुद्देमाल तसेच २६३० रु.रोख रक्कम असा एकुण १,८५,५३०/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. यातील आरोपीत यांचेविरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३,४,५,६,७ व भारतीय दंड संहिता अधिनियम कलम ३७० तसेच महा.पोव्ही.अधि.कलम ६५(ई) प्रमाणे कुडाळ पोली ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ या कायद्याखाली दाखल होणारी जिल्हयातील पहिली कारवाई आहे.तसेच जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी आपआपले पोलीस ठाणे हद्दीमध्ये अशाप्रकारे वेश्याव्यवसाय करणारे अवैध धंद्यांवर धडक कारवाई करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या असुन वारंवार असे गुन्हे करणाऱ्या लोकांवर योग्यती प्रतिबंधात्मक तडीपाराची कारवाई करण्याचे प्रस्ताव पाठविण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत.

जिल्हयात अशाप्रकारेच अवैध धंदे तसेच वेश्याव्यवसाय सुरु असल्याबाबत माहिती मिळाल्यास आम्हास तसेच पोलीस नियंत्रण कक्ष संपर्क क्र. ०२३६२-२२८२०० वर येथे संपर्क साधुन महिती देण्याचे अहवान करण्यात आलेले आहे.

धन्यवाद

दिक्षीतकुमार गेडाम